# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ०४/०८/२०२२ (गुरूवार)**

**(सायंकाळ)**

---

### जाती विषयक शिवीगाळ करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. कुही :– अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील मौजा मांढळ येथे दिनांक ०२/०८/२०२२ चे १७:३० वा. ते १८.१५ वा. दरम्यान फिर्यादी नामे– रितीक राष्ट्रपाल लोखंडे, वय १८ वर्ष रा. विरखंडी ता. कुही हा आठवडी बाजार करित असतांना आरोपी क्र. १) शंकर पांडुरंगजी रेवतकर, वय २७ वर्ष, २) जगदीश महादेव सोनुले, वय ३८ वर्ष दोन्ही रा. विरखंडी, ता. कुही, जि. नागपुर यांनी दारू पिण्यास पैसे मागितले व फिर्यादीने न दिल्याने आरोपीने फिर्यादीस जातीवाचक शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम ३(१)(आर)(एस)३(२)(५ए) अनूसुचित जाती व अनुसुचित जमाती अत्याचार प्रतिबंधक अधि. १९८९ सहकलम ५०४, ५०६ भादवी अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास श्री. भिमराव टेळे उपविभगीय पोलिस अधिकारी उमरेड विभाग उमरेड हे करीत आहे.

### गळफास लावून मृत्यु

१) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत ३० कि.मी अंतरावरील चनकापुर शिवारावरील जंगलात दिनांक ३१/०७/२०२२ चे ०९:३० वा. ते दिनांक ०२/०८/२०२२ चे पुर्वी फिर्यादीचे वडिल नामे– **साहेबराव चंपतराव सलाम(मृतक), वय ४६ वर्ष, रा. गोंडी खापा** याने दारूचे नशेत चनकापुर शिवारातील जंगलात दुपटयाची चिंधी फाडुन गळयाला बांधुन गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– विक्की साहेबराव सलाम वय २० वर्ष रा गोंडी खापा यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. काटोल येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोउपनि श्री बोळगीर मो.नं. ९७६५७७१९७७ हे करीत आहे.

२) पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत १० कि. मी अंतरावरील कचारीसावंगा येथे दि. ०२/०८/२०२२ चे १३.०० ते १३.३० वा. सुमारास **सुरेंद्र वसंता कोहळे (मृतक), वय ३४ वर्ष रा. कचारीसावंगा ता काटोल जि. नागपुर** याने कोणतेतरी अज्ञात कारणाने स्वत: घराचे स्लॅपचे लोखंडी हुकाला नायलॉनचे दोरीने गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– वसंता पंजाबराव कोहळे, वय ६२ वर्ष रा. कचारीसावंगा ता काटोल जि. नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कोंढाळी येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलीस हवालदार भोजराज तांदुळकर मो.नं. ९९२२३१४४४२ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**